मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401305

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ग्रंथा/०८/२३-२४

दिनांक :- २४/०५/२०२३

# जाहिर दरपत्रक

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत सार्वजनिक वाचनालय, विरार व डॉ.के.व.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय, नवघर ही दोन सार्वजनिक वाचनालये तसेच त्यांच्याशी संलग्न अभ्यासिकांसाठी सन २०२३-२४ वित्तिय वर्षाकरीता खालील नमूद कामासाठी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर जाहिर दरपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे. त्याद्वारे नोंदणीकृत व योग्य त्या वर्गातील ठेकेदाराकडून नमूद कामांसाठी सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके दि. २४/०५/२०२३ ते दि. ०५/०६/२०२३ याकालवधीत सकाळी १०.०० ते सायं.५.०० वाजेपर्यत वसई विरार शहर महानगरपालिका सार्वजनिक वाचनालय, विरार दुसरा मजला विरार (पूर्व) येथे सुट्टीचे दिवस वगळून जमा करावीत. पुरवठा करावयाचे साहित्य व इतर बाबींचा तपशील तसेच अटी-शर्ती दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या आहेत.

| अ.क्र | तपशिल | दर (सूट टक्केवारीत नमुद करावी) |
|---|---|---|
| अ. | सन २०२३ -२४ या वित्तीय वर्षाकरीता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी मराठी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | |
| अ.क्र | तपशिल | दर (सूट टक्केवारीत नमुद करावी) |
| ब. | सन २०२३ -२४ या वित्तीय वर्षाकरीता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी हिंदी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| अ.क्र | तपशिल | दर (सूट टक्केवारीत नमुद करावी) |
| क. | सन २०२३ -२४ या वित्तीय वर्षाकरीता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी इंग्रजी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| अ.क्र | तपशिल | दर (सूट टक्केवारीत नमुद करावी) |
| ड. | सन २०२३ -२४ या वित्तीय वर्षाकरीता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी गुजराती भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| अ.क्र | तपशिल | दर (सूट टक्केवारीत नमुद करावी) |
| इ. | सन २०२३ -२४ या वित्तीय वर्षाकरीता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी शैक्षणिक पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | टक्केवारी प्रती नग |

## अटी व शर्ती

१) दरपत्रक भरण्याची अंतिम दि. ०६ /०६/ २०२३ रोजी सायं.५.०० वाजेपर्यत राहिल.

२) ठेकेदारांनी दरपत्रक भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा. तसेच लिफाफा क्र. १(तांत्रिक बाबी) मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असणे आवश्यक आहे. (अ) पॅनकार्ड (ब) आधारकार्ड (क) जी.एस.टी प्रमाणपत्र (ड) गुमास्ता प्रमाणपत्र (इ) इसारा रक्कम(एकूण रक्कमेच्या १%) रू.१०,०००/- चा धनाकर्ष इ.कागद पत्रांचा लिफाफा क्र. १(तांत्रिक बाबी) मध्ये समावेश नसल्यास लिफाफा क्र. २ (आर्थिक / वित्तीय /दराचा) उघडण्यात येणार नाही.

३) लिफाफा क्र. २ (आर्थिक / वित्तीय /दर बाबी) मध्ये फक्त सवलतीची टक्केवारी नमुद करावी.त्यासाठी व्यक्ती अथवा संस्थेच्या लेटर हेडचा वापर करावा.

४) मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रक शक्य झाल्यास त्याच दिवशी दि. ०६ /०६/ २०२३ रोजी सायं.५.०० नंतर उघडण्यात येतील.

५) शासनाचे सर्व विविध कर जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

६) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.

७) मुदतीत प्राप्त झालेली कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका ह्यांनी राखून ठेवलेला आहे.

८) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने १० दिवसाचे आत कार्यालयात उपस्थित राहून सदरच्या कामाची सुरक्षा रक्कम( एकूण रक्कमेच्या २%) रू.२०,०००/- चा धनाकर्ष जमा करून करारनामा रू.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करावयाचा आहे.

९) वरील अटी व शर्तीचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांची दरपत्रके पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

ठिकाण :- सार्वजनिक वाचनालय, विरार(पूर्व)
वसई विरार शहर महानगरपालिका .

उप- आयुक्त (वाचनालय विभाग)
वसई विरार शहर महानगरपालिका